पारावरच्या गप्पा

# स्वस्त युरियाचं त्रस्त लिंकिंग; गावरान दोस्तांचं स्मार्ट थिंकिंग!



देवदर्शन आटोपून संपत पारावर बसला होता. तेवढ्यात गणपतही देवदर्शन घेऊन संपतजवळ येऊन बसला. परंतु मनात काहीतरी विचार सुरू असल्यामुळे गणपत शांत होता. त्याची शांतता मोडत संपत म्हणाला, ''कारं गंपा, आज लई शांत शांत. पावसानं भिजून डोकं शांत झालं, का तू गारठला म्हणून एवढा गार पडलाय?''

संपतच्या मस्करीला दाद मिळाली नाही, उलट चिडून गणपत म्हणाला, ''या सरकारला येड लागलंय काय हेच कळत नाही. कोरोनामुळे सोशल डिस्टन्सिंग ठेवा म्हणतंय आणि कृषी सेवा केंद्रांपुढे मात्र मोठ्या रांगा लावा युरिया घेण्यासाठी आणि करा गर्दी व वाढू द्या करोना! सरकारला एवढंही कळत नाही का? आता हंगाम चालू आहे. खतांचा तसेच इतर शेती उपयुक्त वस्तूंचा योग्य प्रमाणात पुरवठा केला तरच शेती करता येईल ना? मग एवढे असूनही युरिया खताच्या एका गोणीसाठी बेसुमार गर्दी... या अडचणी सरकारला कळत नाहीत का? अरे संपा, मी चार दिवसांपासून सर्व दुकानं पालथी घातली पण एक गोणी युरिया काही मिळाला नाही. कोणतं खत द्यावं याचाच विचार करतोय.''

अर्थात संपाला हा विषय माहीत नव्हता असं नाही परंतु गणपतची समजूत काढण्यासाठी काहीतरी बोलणे गरजेचे होते.

''अरं गंपा, एवढे वैतागून कसे चालणार बरं. मलाही माहीत आहे युरिया खताचा तुटवडा आहे आणि त्या गोण्या मिळत नाही म्हणून. परंतु प्रयत्न करून जेवढे खत मिळेल त्याचा वापर चांगल्या पद्धतीने करणे एवढे आपल्या हातात आहे. तू म्हणतो तसे शासनही युरिया खताची उपलब्धता करून देण्यामध्ये कमीच पडलेले आहे. त्यांनी त्यांचे प्रयत्न केले, आपणही आपले प्रयत्न सुरू ठेवायचे. खतांचा वापर करताना त्यामध्ये नत्राचे प्रमाण योग्य ठेवून वापर करायचा एवढेच सध्यातरी आपल्या हातात आहे.''

यावर मात्र गणपत आणखीनच वैतागला, ''संपा, तुझं तर मला शास्त्रच कळत नाही. आपल्या हातात काय आहे हेही मला कळतं. परंतु शासनाला पाहिजे त्या प्रमाणात युरिया उपलब्ध करून द्यायला काय हरकत आहे? आपण पैसे मोजतोच ना खताच्या

गोणीला; कोठे आपण सरकारकडून फुकट मागितले आहे हे खत? मग जेवढी मागणी तेवढा पुरवठा केला पाहिजे ना! मी काल एका दुकानात गेलो. त्यांनी सांगितले, एक गोणी युरिया घेतला तर एक गोणी दुसरं खत घ्यावं लागेल. मला तर प्रश्‍नच पडला. मला इतर खत नको असताना मी ते का घ्यावं? म्हणजे एकतर सरकारने पुरवठा कमी केला आणि इकडं दुकानदार अडवणुकीची भूमिका घेतात. असं का होतं हेच मला कळंना बघ.''

यावर संपत हसून म्हणाला, ''हे बघ गंपा, आज सर्वात स्वस्त खत म्हणजे युरिया. इतर कोणत्याही खतापेक्षा निम्म्या किंमतीपेक्षा कमी किंमतीमध्ये युरियाची गोणी मिळते. अनेक शेतकऱ्यांना खत वापरण्याचे ज्ञान कमी आहे. शेतकरी गोण्यांचा हिशोब करून खत वापरतात. त्यामुळे आज आपल्या शेतामध्ये युरिया म्हणजे नत्रयुक्त खतांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. म्हणजे जेथे स्फुरद, पालाश या खतापेक्षा दुप्पट प्रमाणात नत्र वापरण्याची गरज आहे तेथे तेच प्रमाण आज चार ते सहा पटींपेक्षा जास्त झाले आहे. यामुळे आपल्या जमिनीमध्ये नत्राचे प्रमाण वाढून पिकावर रोग-किडींचे प्रमाण वाढले आहे. तसेच नत्राचा निचरा होऊन पिण्याच्या पाण्यामध्ये नत्राचे प्रमाण वाढले आहे. यामुळे पर्यावरणावर अनिष्ट परिणाम होत आहे. याचा विचार करून नत्राचा वापर कमी करण्यासाठी शासनाचा प्रयत्न आहे. तू एक बातमी वाचली असेल की शासन हा विचार करतेय की जे शेतकरी युरिया विकत घेतील त्यांना जिवाणू खत विकत घेणे बंधनकारक करणार आहे. यामुळे जमिनीत जिवाणूंचं प्रमाण वाढेल आणि युरियाचाही वापर योग्य प्रमाणात होईल.''

यावर गणपत आणखीनच गोंधळला, '' मला तर आता वाटायला लागलंय, सरकारचं आणि तुझंही डोकं फिरलंय. एकीकडे युरियाचे शॉर्टेज. दुसरीकडे दुकानदारच इतर खतांचं लिंकिंग करून शेतकऱ्यांना लुबाडतोय आणि आता तर तू सांगतो की, सरकार युरियाला लिंकिंग करण्यासाठी प्रोत्साहन देतंय. आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय अशी गंमत झाली बघ आपल्या सरकारची अन् शेतीची. तू म्हणतो नत्र खतांचा वापर वाढला कारण युरिया खत स्वस्त आहे. मग युरिया खताच्या किंमती वाढवा ना! एकदम किंमती वाढविण्याऐवजी हळूहळू किंमती वाढवा. युरियाच्या किंमती वाढल्यानंतर शेतकरी फक्त युरिया वापरण्याऐवजी इतर मिश्र खतांचाही वापर करतील. यामुळे खतांचा संतुलित वापर होईल. हे सर्व करण्याऐवजी जिवाणू खत विकत घेणे बंधनकारक का? जिवाणू खतांचा खरोखरच फार चांगला फायदा होत असेल तर शेतकरी वापरतील किंवा आजही शेतकरी वापरत आहेत, त्यासाठी ते बंधनकारक करणे म्हणजे तोंड दाबून बुक्क्यांचा मार. जिवाणू खतांचा वापर वाढविण्यासाठी युरिया घ्या, ही काय पद्धत आहे काय? युरिया खतांचा वापर कमी करण्यासाठी खरं तर शेतकऱ्यांना याबाबत चांगले प्रबोधन करणे, नत्र खतांचा चांगला कार्यक्षम वापर वाढविण्यासाठी योग्य स्वरुपातील नत्रयुक्त खतांची उपलब्धता करणे यासारख्या उपाययोजना करणे गरजेचे आहे.''

गणपतचे बालणे संपतही मन लावून ऐकत होता. मध्येच अडवून संपत म्हणाला, ''गंपा, तू म्हणतो ते मलाही पटते. एकतर सरकार म्हणतंय की, युरिया खताची शेतकऱ्यांना कमी पैशात उपलब्धता करून देण्यासाठी हजारो कोटी रुपयांचे अनुदान द्यावे लागते. आज सर्व खतांवरील बंधने काढली आहेत, ज्यांच्या किंमती कंपन्या ठरवितात. युरियावर मात्र अजूनही निर्बंध आहेत. या खताची निर्मिती, किंमती आणि वितरण करण्यावर सरकारची बंधने असल्यामुळे आजही या खताबद्दल सततच तक्रारी येत असतात. सरकारला वाटत असेल तर त्यांनी पुढील पाच-दहा वर्षात युरियावरील निर्बंध हळूहळू काढावेत. तसंच त्याच्या किंमती बाजारभावाप्रमाणे ठेवल्या आणि त्या खतांच्या वापरावर कसा परिणाम होतो यावर लक्ष ठेवले तर निश्‍चितच काहीतरी

चांगले बदल होतील. युरियाचा वापर कमी करण्यासाठी जिवाणू खतांचे लिंकिंग करणे आणि त्याद्वारे जिवाणू खतांचा वापर वाढविणे हे मलाही पटत नाही. मागील तीन दशकांपासून जिवाणू खतांचा वापर वाढविण्यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जाऊन आणि काही प्रमाणात त्याला यशही येत आहे. आज अनेक शेतकरी जिवाणू खतांचा वापर त्यांच्या गरजेनुसार करत आहेत. त्यांच्याकडील पीक, हवामान, जमिनीची परिस्थिती याचा विचार करून ते त्यांना पाहिजे ते जिवाणू खत विकत घेऊन वापरत आहेत. हे सर्व सुरू असताना या जिवाणू खतांची जोड युरियाबरोबर लावणे आणि त्यामळे शेतकरी युरियाचा वापर कमी करतील, अशी स्वप्नं पाहणे म्हणजे खरोखरच आंधळी कोशिंबीर खेळण्यासारखे आहे बघ गंपा! असे काही करण्याअगोदर अशा प्रकारच्या गोष्टींची सत्यता आणि प्रत्यक्ष त्याचा वापर करणे याबद्दल किती माहिती घेऊन प्रत्यक्ष त्याचा कसा अवलंब होऊ शकतो, याबद्दल विचारमंथन झाले आहे की नाही ही खरोखरच विचार करायला लावणारी गोष्ट आहे.''

गणपत संपतच्या बोलण्यावर मान डोलावत होता. कारण गणपतच्या मनात जे होतं तेच संपत बोलत होता. त्यामुळे त्याला ते सर्व पटत होतं.

''पण संपा, मला एक कळत नाही की अनेक वर्षांपासून सरकार आणि शेतीतज्ञ सांगतात की युरियाचा वापर वाढल्यामुळे जमिनी खराब होत चालल्या आहेत. मग एवढे असताना मागील दहा वर्षांत प्रत्येक खताच्या किंमती दुप्पट- तिप्पट झाल्या. युरियाच्या किंमती सरकारने का वाढविल्या नाहीत? इतर महाग खते शेतकरी घेऊन वापरतात मग युरिया महाग झाला तर शेतकरी वापरणार नाहीत, असे वाटते की काय सरकारला?''

यावर संपत हसून म्हणाला, ''युरिया खताच्या किंमती, सरकार आणि राजकारण हा त्रिकोण आहे बघ. आजवर विविध पक्षांची सरकारे आली परंतु युरिया बंधनमुक्त करणे तसेच किंमती वाढविणे कुणालाही जमले नाही कारण युरियाच्या किंमती वाढल्या तर शेतकरी नाराज होईल आणि आपल्या पक्षाला कमी मतदान होईल, आपले सरकार पडेल अशी काही प्रमाणात भीती त्यांना वाटत असेल. पूर्वी सर्व खतांवर बंधने होती. ती बंधने काढली. खते महागली. तरी शेती सुरुच आहे. पूर्वी डिझेलवर बंधनं होती. त्यासाठी सरकार हजारो कोटी रुपयांचा तोटा सहन करत होतं. आज डिझेल बंधनमुक्त झाले. डिझेल महागले. परंतु गाड्या चालू आहेत. वाहतूक चालू आहे. ट्रॅक्टरच्या मशागती चालू आहेत. युरियाचा फार मोठा बागूलबुवा सर्वांनी करून घेतला आहे. एकदाचा करा युरिया बंधनमुक्त, मग बघा काय होतं ते. मी सांगतो गंपा, युरिया महागला तर आपोआप त्याचा वापर कमी होईल. शेतकरी युरियाचा वापर जपून करतील. तसेच युरियाचा कार्यक्षम वापर वाढविण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करतील अर्थात त्यामुळे पीक उत्पादन खर्चात वाढ होईल. गंपा, मी सतत म्हणतो शेतकऱ्यांना अनुदानावर काहीच देऊ नका. फक्त त्याला त्याच्या शेती उत्पादनाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य दर द्या. तसेच दर देताना तो तकलादू हमीभाव नको, तर खराखुरा सर्वसाधारण बाजारामध्ये विकता येईल असा असावा. परंतु हे सर्व न करता शेतकऱ्यांचे हात-पाय बांधायचे आणि पाण्यात लोटून द्यायचे हे सरकारचे धोरण शेतीला तोट्याकडे आणि शेतकऱ्यांना एखाद्या दुर्दैवी निर्णयाकडे घेऊन जाणारे आहे! शेतकऱ्यांच्या व्यवसायामध्ये जास्त लुडबूड न करता सर्व बंधने काढून टाकली तर बघा शेतकरी कसा मोठी झेप घेऊन देशाला प्रगतिपथावर घेऊन जातो की नाही.''

यावर मात्र गणपत संपतच्या पाठीवर थाप टाकून म्हणाला, ''चल मित्रा. खरंच तू हुशार आहे. चल आज चहा माझ्याकडून...''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**

■